# आकाश चिन्ह, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक परवानगी धोरण,

# नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक २०२४

## अनुक्रमणिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २ | व्याख्या | १ |
| ३ | आकाश चिन्ह परवाना आवश्यक कागदपत्रे | ४ |
| ४ | छाननी शुल्क | ५ |
| ५ | जाहिरात शुल्क | ५ |
| ६ | जाहिरात फलकाचा आकार, अंतर, उंची | ५ |
| ७ | विकास शुल्क | ६ |
| ८ | परवानाधारक अभियंत्यांकडून नकाशे आवश्यक | ६ |
| ९ | स्ट्रक्चरल डिझायनर प्रमाणपत्र | ६ |
| १० | जाहिरात फलक परवाना | ६ |
| ११ | आकाश चिन्हावर माहिती दर्शविणे | ६ |
| १२ | अन्य विभागांची हरकत व निराकरण | ७ |
| १३ | तडजोड शुल्क | ७ |
| १४ | अनधिकृत  जाहिरात फलक | ७ |
| १५ | हमीपत्राची जबाबदारी | ७ |

**संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ**

**१** १. या अधिनियमास, आकाश चिन्ह बोर्ड, बॅनर, फ्लेक्स, जाहिरात फलक परवानगी धोरण, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नाशिक २०२४, असे म्हणावे.

२. तो, संपूर्ण नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीत लागू आहे.

३. तो, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल, परंतु, प्राधिकरणास योग्य वाटेल तेव्हा, या अधिनियमाच्या तरतुदीत बदल करता येईल.

**व्याख्या**

२ संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर, या अधिनियमात -

(१) **जाहिरात** म्हणजे कोणतीही खाजगी/सार्वजनिक/राज्य सरकार/केंद्र सरकार / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / शासकीय कंपन्या/शासकीय प्राधिकरणे इत्यादींची जमीन / इमारत/इमारतीच्या सभोवतालच्या जागा/गच्ची/प्राकारावर/बांधकामे यावर कोणतीही साधने किंवा कोणत्याही रीतीने मांडलेले जसे, उद्घोषणा किंवा निर्देश, हे जसे की, शब्द, अक्षर, नमूना (Model), भित्ती पत्रके, जाहिरात फलक, कापडी-फलक, तात्पुरत्या कमानी, प्रकाशित चिन्हे, नाम फलक, दिशादर्शक फलक, आकाश चिन्ह, प्लाकार्ड, डिजिटल बोर्ड, एलईडी, एलसीडी, बॅकलिट बोर्ड, निऑन बोर्ड डिसप्ले, ईलेक्ट्रॉनिक डिसप्ले, व्हिडीयो डिसप्ले, लेझर शो/देखावा, फूगे इत्यादी ह्यामधील कोणत्याही प्रकारच्या साधनानी, किंवा माध्यमाद्वारे ग्राहकांना आकर्षित करून किंवा माहिती देऊन व्यावसायिक फायद्याकरिता किंवा प्रसिद्धीकरिता, कोणत्याही रस्त्यावरून, मार्गावरून दिसेल अशा रीतीने मांडलेले निवेदन किंवा प्रदर्शित केलेली कोणतीही कृती यांचा त्यात समावेश होतो. परंतु, ग्राफीटी स्वरुपाची प्रदर्शित आणि महानगरपालिका किंवा कोणतीही सरकारी प्राधिकरणे यांच्याद्वारे (व्यावसायिक लाभाखेरीज) नागरिकांच्या लाभाकरिता प्रदर्शित करण्यात येणारे नागरी संदेश, याद्वारे केलेली कोणतीही निवेदने किंवा प्रदर्शित केलेली कोणतीही कृती, शब्द, हे जाहिरात म्हणून समजण्यात येणार नाही.

(२) **फुग्यावरील जाहिरात** म्हणजे गॅस भरून हवेमध्ये तरंगणाऱ्या फुग्यावरील जाहिरात.

(३) **अभिकरण (एजन्सी)** म्हणजे वैयक्तिक अर्जदार, नोंदणीकृत धर्मादाय संस्था, पेढी (फर्म), शासकीय/निमशासकीय संघटना, भागीदारी किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये विधिसंस्थापित झालेली कंपनी.

(४) **कापडी-फलक (बॅनर)** म्हणजे कापड किंवा साहित्य ज्यामध्ये सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करण्यासाठी काही जाहिराती किंवा उद्घोषणा किंवा लेखी विषय समाविष्ट असतील.

(५) **बस आश्रय** स्थानकांवरील जाहिरात म्हणजे बस आश्रय स्थानाच्या संरचनेवर प्रदर्शित केलेली जाहिरात, ज्यामध्ये कॅन्टीलिव्हर, लॉलीपॉप इत्यादींचा समाविष्ट होत नाही.

(६) **इमारती आवरणावरील जाहिरात** म्हणजे बांधकाम चालू असणारी किंवा दुरूस्ती चालू असणारी इमारत, जिच्या परांची वर प्रदर्शित केलेली जाहिरात.

(७) **कॅन्टीलिव्हर** म्हणजे रस्त्याच्या दुभाजकावर किंवा पादचारी मार्गावर / फरसबंदी रस्त्यावर रस्त्याची दिशा / ठिकाणे किंवा जाहिराती प्रदर्शित करण्यासाठी वापरण्यात

येणारा एका बाजूकडे आधार दिलेला / बसवलेला आणि आधार न दिलेल्या लांब भागाच्या अन्य बाजूकडे वाहून नेणारा / क्षितिजलंब असणारा लांब गज.

(८) **आयुक्त** म्हणजे महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे.

(९) **सक्षम प्राधिकारी** म्हणजे आयुक्त किंवा पालिका आयुक्तांनी रितसर अधिकृत केलेला महापालिकेचा कोणताही अधिकारी.

(१०) **दिशादर्शक फलक** म्हणजे जमीन किंवा इमारतीच्या छपराचा कोणताही भाग यावर कोणत्याही बांधकामाचा तट/भिंत, यावर उभारलेल्या बांधकामाचा कोणताही दर्शनी भाग, जो रस्ता, इमारत, पार्क किंवा खाजगी आणि व्यावसायिक अस्थापनानी बनवलेले कोणतेही स्थान (ठिकाण) आणि फलक जे त्यांची कार्यालये किंवा व्यावसायिक निर्गम मार्ग यांची दिशा दाखविण्यासाठी असलेले फलक. शासकीय किंवा निमशासकीय प्राधिकरणे यांनी बसवलेल्या दिशादर्शक फलकांसाठी कोणत्याही प्रकारच्या परवानगीची आवश्यकता भासणार नाही.

(११) **इलेक्ट्रॉनिक प्रदर्शन** म्हणजे बांधकामावर बसवलेले इलेक्ट्रॉनिक पद्धतीने संचालित करण्यात येणारे जाहिरात प्रदर्शन, एलईडी/ एलसीडी/न्युऑन साईन इत्यादी.

(१२) **गंत्री जाहिरात** म्हणजे, रस्त्याच्या दोन्ही बाजूस उभारलेल्या गंत्रीवर आणि बहुतकरून रस्त्याच्या कोणत्याही बाजूस असलेल्या धातुच्या पूर्वरचित बध्द स्तंभांच्या भागावर, ज्यावर दिशादर्शक फलक वाहतुकीच्या बाजूकडे तोंड करून व जाहिरातीचा दर्शनी भाग वाहतुकीच्या विरूध्द बाजूकडे तोंड करून, रस्त्याच्या बाजुला असलेल्या त्या स्तंभांच्या सर्वात वरच्या भागास प्रकाश योजना सोडून बसविलेली तथापि, पादचाऱ्यांना अडथळा होणार नाही अशी कायमस्वरूपी कमानीवरील जाहिरात, असा आहे.

(१३) **काचेच्या दर्शनी भागावरील** जाहिरात म्हणजे कोणत्याही इमारतीच्या/ बांधकामाच्या काचेच्या दर्शनी भागावरील लावलेली किंवा चिटकवलेली जाहिरात.

(१४) **ग्लो साईन बॉक्स** जाहिरात म्हणजे धातुच्या पत्र्याच्या पुढील बाजूस कोणतेही पारदर्शक, अर्धपारदर्शक पडदा बसवून, तिच्या मागील बाजूकडून विद्युत दिव्यांचा उपयोग करून प्रदर्शित केलेली जाहिरात.

(१५) **भूभाडे** म्हणजे भोगवटादाराद्वारे कोणत्याही कारणाकरिता वापरण्यात येणाऱ्या जमिनीच्या मालकास इमारतीच्या / जमिनीच्या मालकास इमारतीच्या / जमिनीच्या भोगवटादाराद्वारे भाडेपट्टा / भाडेदारी या मार्गाने अदा करण्यात येणारे भाडे.

(१६) **जाहिरात फलक** म्हणजे जाहिरातीच्या उद्दिष्टाकरिता आणि जनतेला कोणत्याही ठिकाणी आकर्षित करण्याच्या दृष्टीकोनातून माहिती देण्यासाठी, व्यक्ती, सार्वजनिक कामगिरी, विक्रीचा माल इत्यादीची माहिती देण्यासाठी चित्र, शब्द किंवा माहितीसह जमीन, इमारत, इमारतीच्या सभोतालची जागा, गच्ची, प्राकारावर तसेच जमिनीवरील बांधकामाचा कोणताही पृष्ठभाग किंवा कोरी भिंत ह्यावर उभारलेला जाहिरात फलक, त्यामध्ये पारदर्शक स्वरुपाच्या एक किंवा अधिक रंगाचा वापर केलेल्या निऑन बल्ब

/ दिवे / लाईटस इत्यादींचा वापर केलेल्या जाहिरातीं आणि एलईडी दिव्यांचे कटआऊट्स यांचाही समावेश होतो.

(१७) **किऑस्क** म्हणजे माहिती प्रदान करण्यासाठी किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील एक लहान रचना, ज्यामध्ये सहसा परस्पर संवादी डिस्प्ले स्क्रीन किंवा स्क्रीन समाविष्ट असतात.

(१८) **जमीन** म्हणजे जिच्यावर बांधकाम करण्यात येत आहे किंवा करण्यात आले आहे किंवा जी पाण्याने आच्छादलेली आहे अशी जमीन (जमिनीपासून मिळणारे फायदे किंवा भू-संलग्न वस्तू किंवा भू-संलग्न असलेल्या कोणत्याही वस्तुशी कायमच्या जखडलेल्या वस्तू आणि विधानमंडळ अधिनियमितीं अन्वये कोणत्याही सडकेवर निर्माण करण्यात आलेला हक्क यांचा समावेश होतो).

(१९) **अनुज्ञाप्ती** म्हणजे या नियमातील तरतुदींचे अनुपालन करण्याच्या अधीन आकाशचिन्ह, जाहिरात उभारण्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्राधिकारपत्र असा आहे.

(२०) **अनुज्ञापन शुल्क** म्हणजे, काही सेवांचे अनुपालन करण्याच्या विशेषाधिकारांसाठी किंवा व्यवसायांच्या काही प्रणालीमध्ये व्यस्त होण्यासाठी सरकारी अभिकरणाला (एजन्सी) व्यक्ती किंवा व्यवसायिकाद्वारे अदा करण्यात येणारी रक्कम.

(२१) **मालक** म्हणजे याचा कोणत्याही परिवास्तुच्या संदर्भातील अर्थ, जी व्यक्ती उक्त परिवास्तुचे भाडे घेते ती किंवा जी परिवास्तू भाड्याने दिली असती तर, जिला तिचे भाडे घेण्याचा हक्क असता ती व्यक्ती असा आहे व त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होतो:-

**(क)** जो मालकाच्यावतीने असे भाडे घेतो तो अभिकर्ता किंवा विश्वस्त;

**(ख)** जो धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी असलेल्या कोणत्याही परिवास्तुचे भाडे घेतो किंवा अशी परिवास्तू ज्याच्याकडे सोपवली आहे किंवा तिच्याशी ज्याचा संबंध आहे असा अभिकर्ता किंवा विश्वस्त;

**(ग)** उक्त परिवास्तुचा ताबा घेण्यास किंवा तिचा मालक म्हणून असलेल्या हक्कांचा वापर करण्यास, सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही मा. न्यायालयाने नेमलेला धारक, समपहर्ता किंवा व्यवस्थापक ;

**(घ)** सहकारी संस्थांच्या प्रकरणी सदर संस्थेची सर्वसाधारण सभा.

(२२) **आकाश-चिन्ह** म्हणजे, कोणतीही जमीन, इमारत, इमारतीच्या सभोवतालच्या जागा, गच्ची, प्राकारावर किंवा संरचना यावरील संपूर्णपणे किंवा अंशतः कोणताही खांब, स्तंभ, प्रमाणभूत चौकट किंवा इतर बाबींचा आधार दिलेला किंवा यांस जोडलेला जाहिरातीच्या, घोषणेच्या किंवा निदेशनाच्या स्वरुपातील कोणताही शब्द, अक्षर, प्रतिमान, चिन्ह, साधन किंवा प्रतिकृती असा असून, असे जे आकाशचिन्ह किंवा ज्याचा कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासून आकाशात दिसू शकतो ते आकाशचिन्ह, असा आहे व त्यामध्ये असा संपूर्ण खांब, स्तंभ, प्रमाणभूत चौकट किंवा इतर आधार याचा किंवा त्याचा प्रत्येक भागाचा समावेश होतो.

'आकाशचिन्ह' या शब्दप्रयोगात कोणत्याही सडकेवर कोणतीही जाहिरात, घोषणा, किंवा निर्देशन याच्या प्रयोजनासाठी संपूर्णपणे किंवा अंशतः उपयोगात आणलेला कोणताही वायूगोल, हवाई छत्री किंवा तत्सम इतर साधने यांचाही समावेश होतो. परंतु, त्यात पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही :-

**(क)** कोणताही ध्वजदंड, स्तंभ, वायूध्वज किंवा वातकुक्कुट, हा कोणताही जाहिराती, घोषणा किंवा निदेशन यांच्या प्रयोजनासाठी संपूर्णपणे किंवा अंशतः योजण्यात किंवा वापरण्यात आला नसेल तर, असा ध्वजदंड, स्तंभ, वायूध्वज किंवा वातकुक्कुट ;

**(ख)** एखाद्या रेल्वे कंपनीच्या व्यवसायाशी/कामकाजाशी केवळ संबंधित असलेला व कोणताही रेल्वे, रेल्वे स्थानक, रेल्वे आवार, फलाट किंवा रेल्वे कंपनीच्या मालकीच्या स्थानकाकडे जाणारा पोचर्मा यांवर किंवा कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागेवर पडणार नाही, अशा रीतीने सर्वस्वी रोवलेला, पुर्वोक्तप्रमाणे असलेला कोणताही शब्द, अक्षर, प्रतिमान, चिन्ह, साधन किंवा प्रतिकृती;

**(ग)** विकावयाच्या किंवा भाड्याने द्यावयाच्या जमिनीसंबंधी किंवा इमारतीसंबंधी, अशा जमिनीवर किंवा इमारतीवर लावलेली कोणतीही नोटीस;

**आकाश चिन्ह परवाना आवश्यक कागदपत्रे**

**३** आकाश चिन्ह परवाना घेणेकामी अर्जदाराकडून खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील:

| अ. क्र. | खाजगी / शासकीय जमिनीवर परवाना घेणेकामी कागदपत्रे |
|---|---|
| १ | अर्ज विहित नमुन्यात |
| २ | वास्तुविशारद यांनी तयार केलेला फलक उभारण्याचा जागेचा नकाशा (site plan / location plan) |
| ३ | संबंधित जागा मालकाचे संमतीपत्र (रुपये १००/- चे स्टॅम्पवर नोटराईज फोटोसह) |
| ४ | अर्जदाराचे हमीपत्र (रुपये १००/- चे स्टॅम्पवर नोटराईज फोटोसह) |
| ५ | स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी रिपोर्ट नकाशासह (स्ट्रक्टरल इंजिनियर यांचे स्टॅबिलिटी रिपोर्ट) |
| ६ | जागा भाड्याने घेतलेली असल्यास भाडे करारनामा, सातबारा उता-यासह (सातबारा उतारा अलीकडील सहा महिन्याच्या कालावधीतील असावा) |
| ७ | संबंधित जागेचा मोजणी नकाशा अथवा वास्तुविशारदाने केलेला नकाशा, जागेचा फोटो उपग्रह छायाचि (Geo tagging सह.) |
| ८ | इलेक्ट्रिक लाईन जात असल्यास संबंधित विभागाचे ना हरकत दाखला. |

**छाननी शुल्क**

४ जाहिरात फलकाचे प्रस्तावासाठी छाननी शुल्क रक्कम रुपये ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) प्रती जाहिरात फलक इतका लागू राहील.

**जाहिरात शुल्क**

५ आकाश चिन्ह परवानगीकरीता आकारावयाचे जाहिरात शुल्क दर खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | क्षेत्र | जाहिरात शुल्क दर रुपये प्रति चौरस फूट प्रति वर्ष |
|---|---|---|
| १. | प्राधिकरण क्षेत्रामधून जाणारे संपूर्ण लांबीचे द्रुतगती मार्ग, राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग या रस्त्यांवरील आकाशचिन्ह, | रुपये ७०/- (रुपये सत्तर फक्त) |
| २. | वरील एक व्यतिरिक्त नाशिक महानगरपालिकेच्या अंतिम हद्दी पासून दहा किलोमीटर पर्यंत (परिघस्त क्षेत्र) | रुपये ६०/- (रुपये साठ फक्त) |
| ३. | वरील एक व दोन व्यतिरिक्त उर्वरितनाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये | रुपये ५०/- (रुपये पन्नास फक्त) |

**जाहिरात फलकाचा आकार, अंतर, उंची**

६ जाहिरात फलकाचा आकार, अंतर, व उंची याबाबतचे सर्वसाधारण नियम तक्त्यात सूचीबद्ध केले आहेत:

| | |
|---|---|
| **प्रमाण आकार** | १० फुट × २० फुट, २० फुट × १० फुट, २० फुट × २० फुट, २० फुट × ३० फुट, २५ फुट × २५ फुट, ३० फुट × २० फुट, ३० फुट × ३० फुट, ४० फुट × १० फुट, ४० फुट × २० फुट, ४० फुट × ३० फुट, ३० फुट × १५ फुट. |
| **तलीय सूट** | १० फुट |
| **कमाल उंची** | ४० फुट |
| **दोन फलकांमधील किमान अंतर** | १० मी |

तसेच वर उल्लेख केलेल विहित आकाराहून मोठ्या आकाराच्या जाहिरात फलकांना परवानगी देण्यात येणार नाही.

| | | |
|---|---|---|
| **विकास शुल्क** | ७ | आकाश चिन्ह परवानगी प्रकरणी आकारावयाचे विकास शुल्क:<br>आकाशचिन्हास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये परवानगी देणे अपेक्षित असल्याने उक्त अधिनियमाच्या कलम १२४ अन्वये विकास शुल्क आकारणे बंधनकारक आहे. तसेच विकास नियंत्रण नियमावली, २०१८ मधील नियम क्रमांक १७ (६)(i) नुसार स्कायसाईन्स आणि होर्डिंग करिता खालील प्रमाणे (वाणिज्य वापर विचारात घेऊन) विकास शुल्क आकारण्यात यावे.<br>१) ज्या खुल्या जागेत आकाश चिन्हाचे फलक उभारावयाचे आहे अशा जागेतील फलककाकरिता लागणा-या एकूण जागेस सभोवताली अंदाजे दहा फूट अतिरिक्त जागा विचारात घेऊन येणाऱ्या क्षेत्रावर विकास शुल्क आकारण्यात यावे.<br>२) असे आकाश चिन्ह पेंटिंग स्वरूपात भिंतीवर किंवा भिंतसदृश इमारतीवर असल्यास आकाश चिन्हाचे एकूण क्षेत्रफळावर विकास शुल्क आकारण्यात यावे.<br>३) तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२४ ब (१)(अ) अन्वये विकास आकाराची आकारणी फक्त जमीन वापरासाठी असेल व इमारत वापरासाठीची आकारणी जाहिरात फलकासाठी लागू नसेल |
| **परवाना-धारक अभियंत्यां-कडून नकाशे आवश्यक** | ८ | जाहिरात फलकाच्या प्रस्तावासाठी प्राधिकरणाकडील मान्यता प्राप्त परवानाधारक अभियंता अथवा नोंदणीकृत वास्तुविशारद यांचे कडून नकाशे तयार करणे बंधनकारक राहील. |
| **स्ट्रक्चरल डिझायनर प्रमाणपत्र** | ९ | जाहिरात फलकासाठी स्ट्रक्चरल डिझायनर चे प्रमाणपत्र दर २ वर्षांनी घेणे आवश्यक आहे. |
| **जाहिरात फलक परवाना** | १० | जाहिरात फलकाचा परवाना हा दर २ वर्षांनी नूतनीकरण करून घेणे आवश्यक राहील. नूतनीकरण करतेवेळी वरील (३) मध्ये नमूद केलेनुसार जाहिरात शुल्क तसेच वरील (४) मध्ये नमूद केलेनुसार विकास शुल्क आकारण्यात येईल |
| **आकाश चिन्हावर माहिती दर्शविणे** | ११ | आकाश चिन्ह बाबत होर्डिंग वर क्यूआर कोड, परवानगी क्रमांक, मंजुरीनुसार वैधता कालावधी, इत्यादी ठळकपणे दिसेल अशा रितीने नमूद करण्यात यावे. |

**अन्य विभागांची हरकत व निराकरण**

१२ आकाशचिन्हाबाबत शासनाच्या अन्य (उदा. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पोलीस विभाग इ.) कोणत्याही विभागाने हरकत घेतल्यास त्याबाबतचे निराकरण अर्जदार यांनी परस्पर करणे बंधनकारक राहील. त्याची कोणत्याही प्रकारची भरपाई अगर तोषिश प्राधिकरणास लागणार नसल्याची व अशा परिस्थितीत सदरची उभारणी तात्काळ काढून टाकणे संबंधितावर बंधनकारक राहील, असे हमीपत्र अर्जदाराकडून घेण्यात यावे.

**तडजोड शुल्क**

१३ जागेवर विनापरवाना जाहिरात फलक असल्यास त्याच्या नियमीतीकरणासाठी वरील शुल्कांव्यतिरिक्त विकास शुल्काच्या दुप्पट तडजोड शुल्क म्हणून आकारणी करण्यात येईल.

**अनधिकृत जाहिरात फलक**

१४ विनापरवानगी/अनधिकृत आकाशचिन्ह संदर्भात करावयाची कारवाई :
आकाश चिन्ह संदर्भात कोणतेही प्रकारची अनधिकृत उभारणी अथवा विकास अथवा बांधकाम निदर्शनास आल्यास किंवा आणले गेल्यास अशा सर्व प्रकारच्या अनधिकृत बांधकामांवर अनधिकृत विकासावर / बांधकामांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार आवश्यक कारवाई प्राधिकरणाच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाने त्वरित करावी.

**हमीपत्राची जबाबदारी**

१५ कोणतेही आकाश चिन्ह उभारताना अथवा त्यानंतर त्या संबंधाने होणाऱ्या कोणत्याही अपघात तसेच त्यामुळे होणाऱ्या जीवित व वित्तहानीसाठी संबंधित अर्जदार/मालक, परवानाधारक अभियंता अथवा नोंदणीकृत वास्तुविशारद, स्ट्रक्चरल डिझायनर हे पूर्णपणे जबाबदार राहतील. त्याची तोषिश प्राधिकरणास लागणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र परवानगी वेळी घेण्यात यावे.